# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-24.06.2026** **वार- बुधवार**

---

**पेरणी**

राज्याच्या काही भागांमध्ये मान्सूनला सुरुवात झाली असली तरी शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये, असा सल्ला राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिला आहे. विधानसभेत एका चर्चेला उत्तर देताना भरणे म्हणाले की, शेतकऱ्यांनी प्रथम आपल्या शेतातली ओलाव्याची पातळी तपासून, पुरेसा ओलावा असल्याची खात्री झाल्यावरच पेरणी करावी. एल निनोसह हवामानातल्या इतर अनिश्चिततेचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना कृषी विभाग मदत करेल असं आश्वासनही त्यांनी यावेळी दिलं.

**शिरोळे**

श्रावणबाळ, संजय गांधी योजनांच्या अटी शिथील कराव्यात आणि त्या योजनांची वार्षिक उत्पन्न मर्यादा ५० हजार करावी, अशा मागण्या आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी आज औचित्याच्या मुद्‌द्याद्वारे विधानसभेत मांडल्या. या योजनेअंतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठी जन्म दाखला किंवा शाळा सोडल्याचा दाखला अनिवार्य करण्यात आला आहे. मात्र ग्रामीण आणि  दुर्गम भागातले  अनेक ज्येष्ठ नागरिक अशिक्षित असून ,त्यांचा जन्म घरी झालेला असल्याने त्यांच्याकडे जन्माची कोणतीही नोंद नाही. या अटींमुळे हजारो वृद्ध, निराधार, गरीब लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित रहातील, अशी भीती शिरोळे यांनी व्यक्त केली.

**सहकार मंत्रालय सहकारी सप्ताह**

केंद्र सरकारच्या सहकार मंत्रालयाच्या स्थापनेला पाच वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त २१ जून ते ६ जुलै  या कालावधीत सहकारी सप्ताह साजरा करण्यात येणार आहे. सप्ताहादरम्यान ,महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे आणि सहकार खाते, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये डिजिटलायझेशन, शेतकरी मेळावे, धान्य साठवण योजना, एआय तंत्रज्ञान, वृक्षलागवड मोहीम आणि युवकांचा सहकार क्षेत्रातील सहभाग वाढविण्यासाठी विशेष कार्यक्रम आदींचा समावेश आहे. सहकारातून समृद्धी, सहकारी चळवळीचे राष्ट्रविकासातील योगदान तसेच सहकार मंत्रालयाच्या विविध उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविणे हा या सप्ताहाचा उद्देश आहे.

**महापौर**

एकल महिलांबाबत सुरु असलेल्या अमानवी प्रथा बंद झाल्या पाहिजेत,त्यांना विकासात समान संधीदेण्यासाठी सर्वांनी दृष्टिकोन सुधारावा असं आवाहन पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांनी केलं. पुणे महानगरपालिका समाज विकास विभाग कोथरूड बावधन क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीनं आयोजित एकल महिला सन्मान कार्यक्रमात त्या काल बोलत होत्या. एकल महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आपण सगळ्यांनीच प्रयत्नशील

राहिले पाहिजे या विषयी महिला बाल कल्याण समिती अध्यक्षा अल्पना वरपे यांनी मार्गदर्शन केलं. एकल महिलांची सामाजिक स्थिती,कायदे आणि हक्क तसंच महिलांसाठी असलेल्या विविध शासन योजना, या विषयावर यावेळी मार्गदर्शन करण्यात आलं.

**<u>संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम</u>**

विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमासंदर्भात पुण्यात सर्वपक्षीय गटनेत्यांची बैठक झाली. अध्यक्षस्थानी पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त तसंच अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी ओमप्रकाश दिवटे होते. या बैठकीत भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. भारत निवडणूक आयोगाच्या सर्व सूचनांचं आणि मार्गदर्शक तत्त्वांचं काटेकोर पालन करण्याचं आवाहन दिवटे यांनी केलं .

**<u>करसवलतींचा लाभ</u>**

पिंपरी चिंचवड च्या नागरिकांना मालमत्ता करावरील सवलतींचा लाभ घेण्यासाठी ३० जून  ही अंतिम तारीख असून त्यानंतर पूर्ण कर भरावा लागणार आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून वेळेत कर भरणाऱ्या, ऑनलाइन मालमत्ता कर, महिला मालमत्ताधारक, दिव्यांग व्यक्ती, स्वातंत्र्यसैनिक तसेच पर्यावरणपूरक उपक्रम राबविणाऱ्या संस्था आणि आस्थापनांसाठी ५ ते ५० टक्क्यांपर्यंतच्या विविध सवलती देण्यात येत आहेत. त्यामुळे ३० जूनपूर्वी मालमत्ता कर भरून सवलतींचा लाभ घ्या, असं आवाहन कर आकारणी आणि  कर संकलन विभागानं केलं आहे.

**<u>पोलिओ लसीकरण मोहीम</u>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकीय विभागाच्या वतीनं येत्या रविवारी 28 तारखेला राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेचं आयोजन करण्यात आले असून, शहरातल्या सर्व पालकांनी आपल्या ० ते ५ वर्षे वयोगटातल्या बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब अवश्य पाजावेत, असं आवाहन महापौर रवि लांडगे यांनी केलं आहे. २९ जून ते ३ जुलै  या कालावधीत आरोग्य कर्मचारी घरभेटी देऊन राहिलेल्या बालकांचे लसीकरण करणार आहेत.

**<u>स्पर्धा</u>**

इंडियन आर्ट कल्चरल ऑफ इंडिया आणि भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २६व्या राष्ट्रीय नृत्य स्पर्धेत ध्रुव ग्लोबल स्कूलची विद्यार्थिनी शारिणी काळे हिने प्रथम क्रमांक पटकावला.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज सकाळपासून आकाश ढगाळ असून, तुरळक ठिकाणी पावसाची नोंद झाली. पुणे जिल्ह्यात घाट परिसरात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागांनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**